# यमक

दोन अंकी नाटक

## ले. प्रल्हाद जाधव

***

पात्रयोजना :

१. शांताबाई (८५)

२. प्रा. विजयसिंह पाटील (४५)

३. आमदार किसनराव ढाकणे  (५०)

४. विनायकराव पवार  (४०)

५. मोहन केळकर (२१)

६. अप्पासाहेब कोल्हे  (५०)

७. माधव अण्णा बर्वे (५५)

८.  राजन किर्लोस्कर (२५)

९. यशवंत (१२)

१०. शांता (१०)

(पडदा उघडतो. शासकीय विश्रामगृहातील एक खोली. प्राध्यापक विजयसिंह पाटील, जिल्हा साहित्य संघाचे अध्यक्ष श्री. विनायकराव पवार, तरूण साहित्यिक मोहन केळकर आणि आकाशवाणी/दूरदर्शन कलावंत प्रशांत अधिकारी ऊर्फ अप्पा बैठकीसाठी जमलेले आहेत. बैठकीचे निमंत्रक आमदार किसनराव ढाकणे अद्याप आलेले नाहीत म्हणून प्राध्यापक पाटील त्यांच्या घरी फोन करताहेत )

प्रा. पाटील : हॅलोऽऽ हॅलोऽऽ आमदार किसनराव ढाकणे यांच घर का ? मी प्राध्यापक विजयसिंह पाटील बोलतोय... इथं रेस्टहाऊसवर बैठक बोलावलीय त्यांनी... पण अद्याप तेच आलेले नाहीत... असं का ? बरं... किती वेळ झाला निघून ? (आ. ढाकणे येताना दिसतात.) ठीक आले... आले साहेब - अच्छा, थँक्यू. (फोन ठेवतात. आ. ढाकणे सर्वांना नमस्कार करत आत येतात. प्राध्यापक पाटलांशी हस्तांदोलन करतात) तुमच्याकडेच फोन केला होता आता....

आ. ढाकणे : आसं का? बरं बसा-बसा! आमाला जरा उशीरच झाला मंडळी, त्या बद्दल आधी दिलगिरी–

पवार : त्यासाठी दिलगिरी कशाला व्यक्त करताय आमदारसाहेब, तुमची गाडी उशिरा सुटणारी असली तरी नंतर वेळ भरून काढणारी आहे याची कल्पना आहे सर्वांना. (केळकर सोडून सर्वजण हसतात.)

आ. ढाकणे : बरं... बरं... मग करायची सुर्वात ? (सर्वांची संमती गृहीत धरत) तर मंडळी कविवर्य यशवंत वामन किर्लोस्कर ऊर्फ रंगविहारी यांची जन्मशताब्दी साजरी करण्यासंबंधी काही प्राथमिक चर्चा करावी म्हणून मी आपना सर्वांना ह्या ठिकानी बोलावलेलं हाये, खरं म्हन्जे इतक्या औपचारिक भाषेत बोलायची काही गरज न्हाई कारन आपन सर्वजन रंगविहारीचे चाहते म्हनून हिते जमलोय. त्यांचा जन्म शताब्दी सोहळा साजरा करून त्यानी मराठी साहित्यावर केलेल्या उपकारातून काही प्रमानात उतराई व्हता येईल आशी आपली सर्वाची भावना हाय. काय सर?

प्रा. पाटील : अगदी बरोबर.

आ. ढाकणे : रंगविहारीच्या साहित्याविषयी बोलन्याचा मला अजाबात अधिकार न्हाई याची मला कल्पना हाये. त्यांच्या साहित्याचे अभ्यासक प्राद्यापक विजयसिंह पाटील, जिल्ला साहित्य संघाचे अध्यक्ष विनायकराव पवार, तरून साहित्यिक मोहनराव केळकर तशेच रेडिवो-टीव्ही स्टार प्रशांत अधिकारी ऊर्फ आप्पा ह्यांच्यासारकी मान्यवर मंडळी ह्या ठिकानी उपस्तित हाये, त्यामुळे रंगविहारीच्या साहित्याविषयी मी विशेष काहीही बोलनार न्हाई. रंगविहारीच्या जन्मशताब्दीनिमित्त सर्व म्हाराष्ट्रात एक नवं, चैतन्याचं वातावरन निर्मान झालेलं असतांनाबी खुद्द त्यांच्या जन्मगावी काहीच कार्येक्रम आयोजित केला जाऊ नये ही गोष्ट आपल्याला आभिमानास्पद न्हाई. एक लोकप्रतिनिधी म्हणून माज्या मनाला ही गोष्ट लागून ऱ्हायलेली हाये. तवा माजी आपल्याला आशी विनंती हाय की रंगविहारींच्या जन्मशताब्दी निमित्त आपन आपल्या गावी एक मोठा समारंभ आयोजित करू. त्यांच्या लौकिकाला शोभून दिसंल आसं त्यांचं स्मारक करू. ह्या कामात खरं म्हंजे तुमच्या सारक्या साहित्यिक मंडळींनीच पुढाकार घ्यायाला हवा. (प्रा. पाटलाना) कवापासून सुरू व्हतेय त्यांची जन्मशताब्दी?

प्रा. पाटील : : सत्तावीस तारखेपासून.

आ. ढाकणे : हां, सत्तावीस तारखेपास्नं! म्हंजे तयारीसाठी आपल्याला आजून वीस- पंचवीस दिसांचा येळ मिळतोय. आपन सर्वांनी मिळून एक जंगी कार्येक्रम आयोजित करू. काय लागंल तो खर्च करू... आता थोडं

खाजगीतच बोलायचं झालं तर मी म्हनेन की सोता शी. एम. सायेब ह्या कार्येक्रमात इंटरेस्टेड हायेत. त्यांच्याकडं आपन काही शब्द टाकला तर ते न्हाई म्हननार न्हाईत, काय सर?

प्रा. पाटील : खरं म्हणजे आमदार साहेबांचा साहित्याशी काहीही संबंध नाही पण असं असतांनाही कविवर्य रंगविहारींची जन्मशताब्दी आपण साजरी केली पाहिजे असं ज्या पोटतिडकीनं ते मांडताहेत ते पाहून असं वाटतं की तेच खरे साहित्यिक आहेत. तसं बघायला गेलं तर आपल्या जिल्ह्यात साहित्यिकांच्या अनेक संघटना आहेत. सांस्कृतिक उपक्रमांच्या दृष्टीनं एक फारमोठी परंपरा आपल्याला लाभलेली आहे. मराठी कवितेचं कैलास लेणं म्हणून ज्यांच्या कवितांकडे बोट दाखवलं जातं त्या थोर कवियित्री शकुंतलाबाई महाजन, ज्यांनी शंभर वर्षापूर्वी महाराष्ट्रातील लेखक-कवींना एक प्रभावी व्यासपीठ मिळवून दिलं ते काव्यसरितसागरकर्ते आनंदराव बर्वे, आद्य नाटककार विष्णुपंत पुरंदरे, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे शिल्पकार भाऊसाहेब चौधरी, मराठी कादंबरीचे आद्य प्रवर्तक विश्वंभर नाथ यांच्यासारखी महान माणसं ह्या मातीमध्ये जन्मून गेली. साहित्य आणि कलेच्या प्रांतात त्यांनी आपापल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला परंतु असं असतांनाही, साहित्य शारदेच्या गळ्यातील अमौलिक मौक्तिक म्हणून महामहोपाध्याय काशीनाथ शंकर पोतनीस ह्यांनी ज्यांचा गौरव केला त्या कविवर्य रंगविहारी ह्यांच्या जन्मशताब्दीविषयी त्यांच्या जन्मगावी आपण उदासीन राहावं ही अगदी दुर्दैवावाची बाब आहे. आणि म्हणूनच आमदारसाहेबांनी जेव्हा माझ्याकडं ह्या विषयाबाबत विचारणा केली तेंव्हा मी त्यांना सुचवलं की जिल्ह्यातील सर्व साहित्यिकांना एकत्र करून आपण एखाद्या कार्यक्रमाचे आयोजन करूया. त्या कल्पनेतूनच आजची ही बैठक होत आहे.

आ. ढाकणे : जिल्हा साहित्यसंघाचे अध्यक्ष विनायकराव पवार ह्यांना मी विनंती करतो की त्यानी ह्यासंबंदी आपले विचार मांडावे.

पवार : आता विचार कसले मांडायचे त्यात? कार्यक्रम झाला पाहिजे असं आमचंही मत आहे पण त्यासाठी आपण पैसे किती गोळा करू शकतो हा सर्वात महत्त्वाचा भाग आहे, असं मला वाटतं. एकदा का आपल्या आर्थिक ताकदीचा अंदाज आला की मग काय कार्यक्रम करायचा हे आपण ठरवू शकतो.

आ. ढाकणे : हे बघा पवारसायेब, तुमी पैश्याची आजाबात काळजी करू नका. ते काम माज्यावर सोपवा. तुमाला फक्त काय कार्यक्रम करायचाय तेवढं ठरवा म्हंजे झालं.

पवार : आता तसं म्हणत असाल तर आपण ह्या भागाचे लोकप्रतिनिधी... स्मारक नेमकं कसं असावं ह्याविषयी कदाचित तुमच्या मनात काही कल्पना असेल... तुम्ही जर तसं काही ठरवलं असेल तर तसं सांगा, आम्ही तुमच्यामागं उभे राहू... एक सूचना मात्र करावीशी वाटते....

आ. ढाकणे : अगदी मोकळेपनानं बोला.

पवार : रंगविहारींच्या कवितांचा सोप्या भाषेत परिचय करून देणारं 'चंडोलाची भरारी' हे पुस्तक मी नुकतच लिहिलंय, समारंभाच्या दिवशी ते प्रकाशित करणं औचित्यपूर्ण ठरेल असं मला वाटतं. अर्थात त्याचा संपूर्ण खर्च हा आयोजन समितीलाच करावा लागेल...

अप्पा : रंगविहारींच्या अनेक कविता नाट्यपूर्ण आहेत त्यापैकी काही कवितांचं नाट्यीकरण करून ते समारंभात सादर करावं अशी माझी सूचना आहे, वाटल्यास ही जबाबदारी मी पूर्णपणे उचलण्यास तयार आहे.

प्रा. पाटील : (आ. ढाकणेंना) ही कल्पना चांगली आहे अप्पाची. नाहीतरी सध्या टीव्हीवर चमकतोय तो. त्याचा कार्यक्रम म्हटल्यावर लोक आणखी गर्दी करतील बघण्यासाठी!

आ. ढाकणे : हे समदं ठीक हाय पन मुख्य स्मारकाची योजना काय आखनार तुमी? (केळकरना) तुमी काहीच का बोलत न्हाई केळकर?

केळकर : मला असं वाटतं की आपण माधव अण्णा बर्व्यांना ह्या बैठकीसाठी बोलवायला हवं होतं. त्यांच्या आजोबांनी म्हणजे आनंदराव बर्व्यांनी आपल्या 'काव्यसरितसागर'मध्ये रंगविहारींच्या कविता प्रथम छापल्या म्हणून ते लोकांना माहीत झाले... माधव अण्णांचाही रंगविहारींच्या कवितांचा चांगला अभ्यास आहे. शिवाय एका साप्ताहिकाचे संपादक आणि निर्भिड पत्रकार म्हणून लोक ओळखतात त्यांना.

प्रा. पाटील : (धुडकावत) चारवेळा त्यांच्या घरी माणूस पाठवला, निरोप देण्यासाठी...

केळकर : ते घरी नसतील तर कुठं बाहेर गेले असतील.

प्रा. पाटील : मला माहीत आहे, ते कुठंही गेलेले नाहीत.

केळकर : मग त्यांना निरोप मिळाला नसेल.

प्रा. पाटील : असं कसं म्हणता केळकर तुम्ही? त्यांना निरोप मिळाला याची खात्री करून घेतलेय मी... आणि तरीही जर त्यांना यायचं नसेल तर काय करणार आपण?

केळकर : बरं, रंगविहारींची पत्नी शांताबाई अजून जिवंत आहे. विशेष म्हणजे त्या ह्याच गावात राहतात. झालंच तर रंगविहारींचा एकुलता एक पुतण्या मुंबई विद्यापीठात प्राध्यापक आहे. तुम्ही ह्या लोकांना बैठकीला बोलवायला काय हरकत होती?

प्रा. पाटील : (केळकरना) तुमच्या माहितीसाठी सांगतो, हा कार्यक्रम करायचा असं ठरलं तेव्हा सर्वप्रथम आम्ही शांताबाईंकडे, त्यांचं मार्गदर्शन मिळविण्यासाठी गेलो होतो. पण त्यांनी काहीच प्रतिसाद दिला नाही. म्हटलं, रंगविहारींच्या जन्मशताब्दी निमित्त तुमचा सत्कार करायचा आहे त्यासाठी तरी तुम्ही उपस्थित रहा... तर एवढच म्हणाल्या की, 'मला विनाकारण त्रास देऊ नका'... मग काय बोलणार पुढं आपण?

पवार : त्यांचा पुतण्या, राजन किर्लोस्कर तो मुंबईत होणाऱ्या एका कार्यक्रमाला प्रमुख पाहुणा म्हणून जाणार आहे. ते चालतं त्यांना.... इथं आला तर कुणाला भेटत नाही कोणी भेटायला गेलं तर त्याच्याशी नीट वागत नाही. पत्र पाठवलं तर उत्तर देत नाही. काय प्रेम आहे ह्या माणसांना रंगविहारींविषयी?

आ. ढाकणे : केळकरांनी उपस्थित केलेला मुद्दा गैर न्हाई पन हे बगा केळकर, आमी त्या द्रिष्टीने आधीच प्रयत्न केले व्हते. पन त्या मानसाना ह्यात इंटरेस दिसत न्हाई तर काय करनार आपन?

केळकर : आपण इंटरेस्ट निर्माण करू शकलो असतो पण तुम्ही काही गोष्टी आधीच गृहीत धरलेल्या आहेत.

आ. ढाकणे : तुमचा कायतरी गैरसमज झालेला दिसतोय. हा कार्यक्रम काही कुन्या एकट्याचा न्हाई. समद्यांना बरोबर घेऊन आपल्याला फुडं जायचं हाये.

केळकर : सर्वांना घेऊन पुढं जायचं असं तुम्ही म्हणता आमदारसाहेब पण स्पष्टपणे बोलायचं तर तुम्ही तसे वागलेले दिसत नाही.

आ. ढाकणे : म्हंजे?

केळकर : निदान नगराध्यक्ष अप्पासाहेब कोल्ह्यांना तरी तुम्ही ह्या बैठकीसाठी बोलावायला हवं होतं की नाही? ते ह्या शहराचे प्रथम नागरिक आहेत. गेली वीस वर्षे सतत निवडून येताहेत. विविध प्रकारच्या संस्थांशी त्यांचे

जवळून संबंध आहेत आणि तुम्हाला याचीसुद्धा चांगली कल्पना आहे की, मुख्यमंत्री त्यांना तुमच्या इतकेच मानतात! त्यांना का बोलावले नाही तुम्ही?

प्रा. पाटील : पुण्याला नगराध्यक्षांचा मेळावा भरलाय त्याला उपस्थित राहण्यासाठी गेलेत ते.

केळकर : ते सकाळी गेले. काल रात्री अकरा वाजेपर्यन्त मी त्यांच्या घरी त्यांच्याशी गप्पा मारत होतो. आजच्या मिटींगविषयी कुणी एका शब्दानंही आपल्याला विचारलं नाही असं त्यांनी मला सांगितलं.

(आमदार पाटलांकडे पाहतात.)

प्रा. पाटील : मी स्वतः त्यांच्या घरी जाऊन त्यांना भेटलो होतो. बैठकीचं रितसर निमंत्रणही दिलं होतं. आणि ही घटना केळकरांच्या समोरच घडली विचार त्यांना.

केळकर : बैठकीची तारीखसुद्धा आधीच ठरलेली आहे हे समजल्यावर एवढा मोठा माणूस कसा काय येणार बैठकीला? त्यांना ही तारीख सोयीची आहे असं विचारलं का तुम्ही?

अप्पा : केळकर, तू उगाचच वाकड्यांत शिरताहेस. चांगल्या कामात कोलदांडा घालायची तुझी सवय सर्वांना माहीत आहे पण निदान त्या रंगविहारींच्या आत्म्याला त्रास होईल अशा काही उचापती करू नकोस एवढं सांगून ठेवतो तुला.

केळकर : रंगविहारींच्या आत्म्याला त्रास होईल अशा उचापती कोण करतंय हे लोकांना चांगलं माहीत आहे. आणि एक लक्षात ठेव की, रंगविहारी ही काही कुणाची खाजगी मालमत्ता नाही त्यांच्या शताब्दीसोहळ्यातून जर लायक माणसांना वगळण्याचा प्रयत्न झाला तर मग आम्हालाही त्याची योग्य ती दखल घ्यावी लागेल. (उठतो.)

आ. ढाकणे : पन तुमी आधी खाली तर बसा.

केळकर : (त्यांच्याकडे दुर्लक्ष करत अप्पाला) तू मला उचापतखोर म्हणतोस म्हणजे स्वत:ला कोण समजतोस तू? एका सिरीयलमध्ये काम मिळालं म्हणून मोरासारखा पिसारा फुलवून नाचतोहेस तू. पण लक्षात ठेव पिसारा फुलवून नाचणाऱ्या मोराला मागे आपलं ढुंगण उघडं पडलंय कधीच लक्षात येत नाही.

अप्पा : (उठत) माझं डोकं फिरवू नकोस.

केळकर : ते आहे कुठं तुला?

(अप्पा केळकरच्या अंगावर धावून जातो पवार व प्रा. पाटील त्याला आवरतात. केळकर सर्वांकडे तुच्छतेने पाहात निघून जातो.)

अप्पा : (केळकर गेला त्या दिशेने पहात) नासका किडा आहे हा साला. जिल्ह्याच्या संपूर्ण सांस्कृतिक विश्वाचं ह्यानं वाटोळं करून ठेवलंय.

आ. ढाकणे : शांत हो तू आधी!

अप्पा : काय शांत होऊ आमदारसाहेब? तुम्ही राजकारणातली माणसं असूनसुद्धा तुम्हाला रंगविहारींविषयी जेवढं प्रेम आहे त्याच्या एक शतांशसुद्धा ह्या नालायक माणसाला नाही.

आ. ढाकणे : हे बग आप्पा, आम्हाला अशा गोष्टी काही नवीन नसतात. आपल्याला तो अपशकून करायला गेला पन त्यासाठी त्याला सोताचच नाक कापून घ्यावं लागलं का न्हाय? जाऊ द्या, आपून आपलं मुद्याचं बोलू... काय कार्यक्रम करायचा बोला पाटीलसर?

प्रा. पाटील : मला असं वाटतं की आपणच सुचवा काहीतरी. त्यावरच सर्वजण विचार करू. (सर्वजण 'हो हो बरोबर' असा होकार भरतात.)

आ. ढाकणे : खरं म्हंजे मला तुमच्या त्या साहित्यातलं कायबी कळत न्हाई. (प्रा. पाटलांना) कोन्ती कविता म्हणालात तुमी ती?

प्रा. पाटील : घरकुल.

आ. ढाकणे : हां घरकुल. तर घरकुल ही रंगविहारींची समद्या दुनीयेत गाजलेली कविता ! तिच्यावर जेवढी चर्चा झाली, लेख लिहून आले तसं भाग्य मराठीतल्या दुसऱ्या कोनत्याही कवितेच्या वाट्याला आलेलं न्हाई. (पाटलांना) बरोबर ना?

प्रा. पाटील : (होकारार्थी मान हलवतात.)

आ. ढाकणे : आकारनं एवढी लहान आसनारी ही कविता अर्थाच्या बाबतीत एवढी महान निघावी हा एक चमत्कारच म्हनावयास हवा. अशा कविता जगात फार थोड्या असतील असा माझा अंदाज हाये, काय सर?

प्रा. पाटील : बरोबर आहे तुमचं म्हणणं. घरकुल ह्या कवितेतून रंगविहारींनी घराचं जे एक चित्र रेखाटलेलं आहे ते अगदी अलौकिक असंच म्हणावं लागेल. आणि त्या कवितेतील शेवटच्या ओळीमुळं कवितेला जी कलाटणी मिळते ती घटना तर मराठी कवितेच्या इतिहासांत अभूतपूर्व अशीच म्हणावी लागेल.

आ. ढाकणे : तर मला आसं वाटतं, जन्मशताब्दी निमित्त रंगविहारींचं स्मारक म्हनून आपन हिरव्या संगमरवराचं एक झकास घरकुलं उभारावं. त्याची एकेक वीट म्हाराष्ट्रातील एकेका मोठ्या साहित्यिकाच्या हस्ते बसवून घ्यावी. त्यासाठी म्हाराष्ट्रातील समद्या मोठ्या साहित्यिकाना आपन निमंत्रनं पाठवून बोलवून घेऊ. दोन दिस कवितांचा जागर साजरा करू. शेवटच्या दिशी नगरचौकापासून रंगविहारींच्या ह्या स्मारकापर्यन्त आपन त्यांच्या साहित्यांची दिंडी काढू. सांगता समारंभासाठी ज्ञानपीठ पारितोषिक मिळवलेले नाटककार माधवराव पटवर्धन याना आपन बोलवू. मागं एकडाव मी त्यांच्याशी ह्यासंबंदी बोललो व्हतो... आपन रंगविहारींसाठी तुमच्याकडं येयाला तयार होओत आसं त्यांनी मला सांगितलं व्हतं... नगर चौकातली मोक्याची जागा आपन स्मारकासाटी मिळवू. मी शीएम सायेबांशी बोलतो. प्रमुख पाहुने म्हनून शीएमनाच बोलवू आपन. घरकुलाच्या स्मारकाभवती चांगली हिरवळ करू, फुलझाडं लावू. जन्मशताब्दीच्या दिशी प्रमुख पाहुन्यांच्या उपस्तितीत हे स्मारक माधवराव पटवर्धन यानी संपूर्न महाराष्ट्राला अर्पन करावे आशी माजी सूचना हाये. (सर्वजण टाळ्या वाजवत 'वा वा क्या बात है' म्हणत त्यांच्या कल्पनेला दाद देतात.)

पवार : स्मारकाची तुमची कल्पना अतिशय उत्तम आहे आपण ती जशीच्या तशी प्रत्यक्षत उतरवू पण माझी एक आग्रहाची विनंती होती.

आ. ढाकणे : सांगा ना मग...

पवार : जन्मशताब्दी निमित्त आपण शांताबाईंचा सत्कार केलाच पाहिजे असं मला वाटतं.

प्रा. पाटील : मघाशी सांगितलं ना, तो प्रयत्न आधीच करून बघितलाय आम्ही. ती बाई काहीच प्रतिसाद देत नाही त्याला काय करणार आपण ?

अप्पा : शिवाय त्यांचा हा सत्कार केवळ एक प्रथा म्हणून करावा लागेल आपल्याला नाहीतर रंगविहारींची बायको यापेक्षा आणखी काय क्वालिफिकेशन आहे तिचं?

पवार : इतकी काही दुर्लक्ष करण्यासारखी ती बाई आहे असं मला वाटत नाही. रंगविहारींच्या यशात तिचाही काहीना काही वाटा हा असलाच पाहिजे.

प्रा. पाटील : कसला आलाय वाटा? रंगविहारींच लग्न झालं तेव्हा ती सहा वर्षांची होती आणि ते वारले तेव्हा चौदा वर्षांची होती म्हणजे फक्त आठ वर्षांचा संसार—त्यातली तिची सहा वर्षे माहेरीच गेली म्हणजे फक्त दोन वर्षांचा संसार. तेवढ्यात काय सुख दिलं असेल त्या बाईनं त्यांना? तुम्हाला एक सांगतो आमदारसाहेब रंगविहारींच्या निराशाग्रस्त भावनांची स्पंदनं ज्या कवितांमधून दिसतात त्या कविता नेमक्या ह्या दोन वर्षांच्या कालावधीतील आहेत.

आ. ढाकणे : आरं तिच्या!

प्रा. पाटील : मला तर असंही वाटतं की रंगविहारींच्या ह्या विमनस्कतेचं मूळ त्यांच्या लैंगिक आस्वास्थ्यामध्येच असावं...

आ. ढाकणे : ठीक हाय, ठीक हाय! हा तुमच्या सौशोधनाचा भाग झाला. त्यातून काय. तात्पर्य काढायचं ते तुमचं तुमी ठरवा पन कवीच्या मोठेपणाविषयी कुनाचं दुमत न्हाई ना? मग झालं तर! त्यांची घरकुल ही कविता आचार्य... ( नाव आठवत नाही म्हणून प्रा. पाटलाना) कोन हो ते?

पाटील : आचार्य नारायण शास्त्री पोतदार.

ढाकणे : हां तर आचार्य पोतदार यानी म्हटल्याप्रमाणे त्यांची घरकुल ही कविता म्हंजे मराठी कवितेतला ताजमहाल हाये ना? मग तेवढच आपन लक्षात घेयाचं... पन तरीसुद्धा एक जनरित म्हनून आपन साडीचोळी देऊन शांताबाईंचा सत्कार करावा असं मला बी वाटतं. जर त्याना समारंबाला येनं जमलं न्हाई तर आपन त्यांच्या घरी जाऊ. तेवढंच त्या बाईला आपल्याला आयुष्याचं सोनं झाल्यासारखं वाटंल !

पवार : आमदारसाहेब, इंग्रजीत अशी एक म्हण आहे की, 'बीहाइंड एव्हरी सक्सेसफूल मॅन देअर इज अ वूमन'

ढाकणे : म्हंजे?

पवार : प्रत्येक यशस्वी पुरूषाच्या मागे एक बाई उभी असते....

आ. ढाकणे : आगदी योग्यच म्हननं हाये ते पन बरं का पवारसाहेब ही उक्ती जर आमच्या बाबतीत लागू करायची ठरवलं तर फक्त थोडासा बदल करावा लागेल.

पवार : कोणता?

ढाकणे : बाईच्या ऐवजी बाऽऽऽया! आसं म्हनावं लागंल (सर्वजण मोठ्यानं हसतात. अंधार होत जातो.)

(अंधारातून चिमण्यांचा चिवचिवाट ऐकू येतो. हळूहळू प्रकाश. रंगविहारींचं घर दिसतं. छोटं अंगण. अंगणाला लागून एकीकडे ओटा. समोर पडवी. पडवीतून चढून वर गेले की घरात जाण्याचा दरवाजा. बाजूला खिडकी. पडवीचे कौलार दिसते. जुनी नळ्यांची फुटकी कौले. त्यातून गवत उगवलेले. भिंती ढासळलेल्या. घराची पडझड

झालेली. रंगविहारींच्या पत्नी शांताबाई आत कुठेतरी आहेत. त्यांचा पुतण्या राजन त्याना भेटण्यासाठी मुंबईवरून आलाय.)

राजन : (येतो. पडवीत बॅग ठेवून कानोसा घेतो.) काकूऽऽऽ ए काकूऽऽऽ ( पडवीतून वर चढून मधल्या दरवाजातून आत डोकावत) काकूऽऽऽ ए काकूऽऽऽ (शांताबाई बाहेर डोकावतात व किलकिल्या डोळ्यांनी राजनकडे पहात राहातात.) मला ओळखलं नाहीत ?

शांताबाई : न ओळखायला काय झालं? राजन ना तू? मला काकू म्हणणारं दुसरं कोण आहे इथं?

राजन : नाही, संशयानं पहात होतीस म्हणून विचारलं.

शांताबाई : काय करणार? रोज कुणी ना कुणी त्रास द्यायला येतं...

राजन : कोण येतं त्रास द्यायला?

शांताबाई : कोण तुमचे ते पत्रकार फित्रकार! लोक शंभरी साजरी करताहेत म्हणे कवीची म्हणून मुलाखती घ्यायला येतात. काय तोंडाला येईल ते विचारतात... कचा कचा फोटो काढतात. त्याना सांगितलं फोटो काढले की आयुष्य कमी होतं, तरी ऐकतच नाहीत.... म्हणून ही अशी आत जाऊन बसते... कधी आलास तू?

राजन : हा काय आत्ताच येतोय. गाडीतनं उतरलो आणि सरळ इकडेच आलो.

शांताबाई : बैस हं – मी आले (आत जातात)

राजन : (बाहेरूनच) चार-पांच वर्षांत केवढा बदल झालाय गावात प्रशस्त सडका मोठमोठ्या इमारती, गाड्या, हॉटेलं, दुकानं... पेठेत माणसांची तर झुम्मड गर्दी होती...

(पाण्याचा तांब्या घेऊन बाहेर येतात व त्याच्या हातात देत) हातपाय धू. अंगणाच्या एका कोपऱ्यांत जाऊन चूळ भरतो. तोंडावर पाणी मारतो. हे चालू असतांना त्याचे बोलणेही चालू असते.)

राजन : लहानपणीची एकही खूण राहिलेली नाही गावांत.

शांताबाई : काळाचा महिमा!

राजन : तू काय करतेस सध्या?

शांताबाई : काय करणार आता ह्या वयात? तू पाठवतोस तेवढ्या मनीऑर्डरवर भागतं. डोळ्यांनी दिसत नाही नीट म्हणून शिवणकाम बंद केलंय हल्ली...

राजन : पैसे खरोखर पुरतात ना? गरज पडली तर मागून घेत जा जास्तीचे. मी तुझ्यावर उपकार करतोय असं समजू नकोस. रंगविहारींच्या चरित्राची पाचवी आवृत्ती संपलीय आता. भरपूर मानधन मिळतंय. त्यावर नैतिकदृष्ट्या तुझाच हक्क आहे असं मानतो मी.

शांताबाई : (तो विषय टाळत) बायको बरी आहे तुझी?

राजन : हो एकदम मजेत!

शांताबाई : आणि आशुतोष?

राजन : फर्स्टक्लास! बालवाडीत टाकलाय यंदा. तुझ्याकडे चाललोय असं सांगीतलं तर मागं लागला होता. म्हणत होता “तुमची काकू कशी दिसते ते बघायचंय मला”.

शांताबाई : (प्रयासाने स्वत:ला सावरत) माझं पत्रं मिळालं?

राजन : हो मिळालं की!

शांताबाई : येशील असं वाटलं नव्हतं. ह्यापूर्वी किती पत्र पाठवली असतील... फक्त येतो म्हणतोस पण येत नाहीस... यावं.... अधून-मधून भेटत राहावं. आपलं माणूस भेटलं की तेवढचं बरं वाटतं. कॉलेज कसं काय चाललय तुझं?

राजन : आता विद्यापीठात असतो मी... चांगलं बस्तान बसलय, शोधनिबंध लिहितोय आता... जागतिक मराठी परिषद भरतेय मुंबईला पुढच्या महिन्यांत. तिथं वाचायचाय.

शांताबाई : कोणत्या विषयांवर लिहितोयस?

राजन : 'रंगविहारी यांच्या कवितेतील स्व आणि स्वेतर विश्वाचं विभेदन' काकांच्या कवितेवर एवढं लिहून आलं पण ह्या विषयाला अजून हातच लावला नव्हता कोणी. माझं एकदा लिहून होऊ दे मग एकेका विद्वानाची तोंडं कशी उतरतात ती बघ. पण ह्या कामात मला तुझ्या मदतीची गरज आहे. काकांच्या काही कवितांविषयी अधिक खोलांत जाऊन माहिती मिळवायची आहे. विशेत: 'घरकुल' ह्या कवितेविषयी ! शिवाय त्या काळातील काही संदर्भांची शहानिशा करून घ्यायची आहे. तसंच काकांच्या खाजगी आयुष्याविषयी आणखी खोलांत जाऊन माहिती मिळवायची आहे....

शांताबाई : म्हणजे ह्या कामासाठी आलाहेस तू इथं...

राजन : नाही म्हणजे तसं... म्हणजे हे तसं विशेष महत्त्वाचं काम नव्हतं... तू आजारी आहेस असं कळवलंस म्हणून म्हटलं तुला बघून यावं. जाता जाता काही माहिती मिळाली तर तीही घ्यावी... तुझी प्रकृती इथं चांगल्या डॉक्टरांकडून तपासून घेऊ आपण. आणि तुझी तयारी असली तर तू मुंबईला चल. तिथं औषधोपचार करून घेऊ.

शांताबाई : औषध घेऊन घेऊन कंटाळलेय मी कधी कधी असं वाटतं आता की पट्कन मरण यावं...

राजन : (गंमतीने) मग त्यासाठी एक सोपा उपाय सांगू?

शांताबाई : कोणता?

राजन : दहा-बारा फोटोग्राफर्सना बोलावतो आणि तुझे भरपूर फोटो काढायला लावतो.

शांताबाई : (स्मीत करत) फोटो काढण्याबाद्दल तसं काही विशेष नाही रे... पण फोटो काढून बाहेर ते त्यांचा धंदा करतात, पैसे कमावतात.

राजन : मग कमवूदे की बिचाऱ्यांना. महाराष्ट्रातील एका थोर कवीची बायको आहेस तू. तुझ्या फोटोमुळं किंवा तुझ्या घराच्या फोटोमुळं जर कुणाचं पोट भरत असेल तर ते तुझं भाग्यच नाही का ?

शांताबाई : कसलं भाग्य घेऊन बसलासं ? फोटोखाली कसली तरी भलती सलती माहिती छापतात त्यामुळं उबग येते अगदी कधी कधी तर हसावं की रडावं हेच कळत नाही.

राजन : म्हणजे?

शांताबाई : अरे गेल्या आठवड्यांत कुणी मुंबईचे लोक आले होते... ह्या इथं पडवीच्या मागं लाकडं भरण्यासाठी एक खोपी केली होती– ती पडून तिचा नुसता चौथरा राहिलाय

राजन : मग?

शांताबाई : एकानं नेमका तोच फोटो काढून छापला आणि त्याच्याखाली लिहिलं की इथं बसून रंगविहारींनी आपल्या अनेक कविता लिहिल्या. (तोंडाला पदर लावतात)

राजन : मग त्यात हसण्यासारखं काय आहे?

शांताबाई : हसू नको तर काय करू ? अरे कवीला जर कधी दारू जास्त झाली तर तिथं जाऊन उलट्या करायचा तो !

राजन :( अविश्वासाने) काय सांगतेस काय तू हे काकू ?

शांताबाई : मग काय खोटं सांगतेय ? माझ्या हातांनी साफ करायची मी ते सर्व...

राजन : एवढ्या वर्षात कधी बोलली नाहीस....

शांताबाई : बोलून काय करायचं? लोकांच्या गप्पांना आणि अफवांना नवे विषय आपणच मिळवून द्यायचे?

राजन : माझ्याजवळसुद्धा बोलली नाहीस... मला लोक समजतेस तू?

शांताबाई : बरं समज तुला सांगितलं असतं, तर काय केलं असतंस तू? तुझ्या काकांचं एवढं मोठं चरित्र लिहिलस त्याचा सर्व चांगला बोलबाला झाला... त्यात लिहिलं असतंस की माझा काका दारुड्या होता? आणि समज तू जरी ते तसं लिहिलं असतंस तरी लोकांनी त्यावर विश्वास ठेवला असता का?

राजन : हे  बघ काकू, सत्य हे लोकांच्या समोर येणं आवश्यक असतं मग ते कितीही कटू असो! आणि समजं रंगविहारी हे मद्यपी होते असं जरी सिद्ध झालं तरी एक थोर कवी म्हणून लोकांच्या मनात त्यांची जी एक प्रतिमा निर्माण झालेली आहे तिच्यावर काही परिणाम होणार आहे का? त्यांची नुसती 'घरकुल' ही एकच कविता जरी घेतली तरी तिने त्यांना मराठी कवितेच्या विश्वात धृवताऱ्यासारखं अढळ स्थान मिळवून दिलंय की नाही?

शांताबाई : 'घरकुल' वरनं बरी आठवण झाली. तू आता आलाच आहेस तर माझ्या ह्या घरकुलाची जरा डागडुजी करून दे बाबा. सगळी पडझड झालीय. देवघरातल्या भिंतीलाही भगदाडं पडलंय त्यातून मांजरं आत येतात, तेवढं बुजवून दे. परसदारी गवताचं रान माजलंय तेही साफसूफ करून दे.

राजन : अगं हो पण मी आलोय तर मला आधी काही चहा वगैरे करून देशील की नाही ?

शांताबाई : देते रे बाबा देते. पण त्यासाठी तुला आधी बाजारात जाऊन साखर घेऊन यावी लागेल.

राजन : बरं ठीक आहे, आण पिशवी.

शांताबाई : येतांना भरताची वांगी आणि ओल्या मिरच्या घेऊन ये भरीत आवडतं ना तुला?

राजन : आवडतं म्हणजे काय नुसतं ऐकूनच तोंडाला पाणी सुटलं. येतांना डॉक्टरांना सुद्धा भेटून येतो. (शांताबाई खुंटीला अडकविलेली पिशवी काढून त्याच्या हातात देतात.) खरं सांगू काकू, मी व्याख्यानांच्या निमित्तानं

भारतभर फिरलोय पण तुझ्या हातचं भरीत आणि भाकरी या पदार्थांना कुठंच तोड नाही. आणि भाकरी करावी तर ती फक्त आमच्या काकूनच!

शांताबाई : त्याचं सर्व श्रेय सासुबाईंना, आभार मान त्यांचे. आत्मा शांत होईल.

राजन : म्हणजे?

शांताबाई : लग्न होऊन पहिल्यांदा घरी आले तेंव्हा सासुबाईंनी एवढी मोठी काटवट पुढे सरकवली... त्यात पायलीभर पिठाची रास ओतली आणि म्हणाल्या “ कर भाकऱ्या "

राजन : मग?

शांताबाई : काय मग? मला कुठल्या तेंव्हा भाकऱ्या करता येत होत्या? अरे माझ्या परकराची नाडी सुद्धा माझी आई बांधून द्यायची तेंव्हा!

राजन : मग?

शांताबाई : घेतलं रामाचं नांव आणि मळलं पीठ. कशीबशी केली भाकरी आणि तव्यात टाकली तर तिचे चार तुकडे झालेले... तव्याच्या काठाचा मनगटाला ह्या इथं चांगला चरचरून डाग मिळाला!

राजन : मग काय झालं?

शांताबाई : सासुबाईंनी माहेरच्या सात पिढ्यांचा उद्धार केला. आणि केसाला धरून फरफटत परसदारी नेली.

राजन : ती कशाला?

शांताबाई : दुसरं कशाला? आडात ढकलायला.

राजन : बापरे!

शांताबाई : भाकरी मोडली की घर मोडतं असं त्या म्हणायच्या! तुझा बाप मध्ये आला म्हणून जगले तेव्हा...

राजन :आणि काका कुठं होते?

शांताबाई : तिथं वरती माळ्यावर बसून गंमत बघत होता... हा हात महिनाभर दुखत होता. भाजल्याची खूण आयुष्यभर राहिली पण तेंव्हापासून पुन्हा कधीही भाकरी मोडली नाही.

राजन : पण काकांनी त्यावेळी काहीच प्रतिक्रिया व्यक्त केली नाही?

शांताबाई : केली ना, प्रतिक्रिया व्यक्त केली...

राजन : काय?

शांताबाई : कविता लिहिली!

राजन : भाजलेल्या हातावर कविता?

शांताबाई : का? हा कवितेचा विषय होऊ शकत नाही? उलट ती कविता समीक्षक डोक्यावर घेऊन नाचवतात. शाळा-कॉलेजातून शिकवली जाते...

राजन : कोणती कविता म्हणतेस तू?

शांताबाई : 'ज्वालांच विलसित!'

राजन : काकू...

शांताबाई : विश्वास नाही ना बसत?

राजन : ही कविता तर आम्ही सृजनाचं प्रतीक म्हणून शिकवतो.

शांताबाई : तेच सांगतेय मी. (अंधार होऊ लागतो. उपरोधाने त्या कवितेच्या ओळी म्हणू लागतात.)

ज्वालांची उन्मनी विलसिते

थरकते काजळी

जल नयनातील लखलखते

अहा रम्य मग भृंग मानसी

करितो रसपानाते

विश्वची गाणे होते.

(त्या मनगटावरच्या डागाकडे पहात रहातात. राजन अवाक् झालेला. पूर्ण अंधार. प्रकाश उजळतो तेव्हा नगराध्यक्ष कोल्हे यांची बैठकीची खोली दिसते. ते वर्तमानपत्र चाळत आहेत. बाहेरून माधवअण्णा बर्वे येतात.)

बर्वे : काय नगराध्यक्षसाहेब येऊ का?

कोल्हे : या या या तुमचीच वाट बघत व्हतो. मोस्ट वेलकम.

बर्वे : कसलं एवढं वाचन चाललंय?

कोल्हे : दुसरं काय येतंय पेप्रात हल्ली? सगळ्या त्या रंगविहारींच्या जन्मशताब्दीच्या बातम्या ! आनि त्यांच्यापेक्षा त्या ढाकन्याचंच कौतुक जास्त! युसलेस फेलो! जसा काय आपलीच जन्मशताब्दी साजरी करतोय...

बर्वे : एवढी प्रचंड प्रसिद्धी मिळणार असेल तर स्वतःच्या जन्मशताब्दी- साठीही स्वर्गातून खाली यायला कमी करणार नाही तो.

कोल्हे : स्वर्गातून? अवो, ह्याला तर नर्कातसुद्धा जागा मिळनार न्हाई हे लक्षात ठेवा. दुसरा काही उद्योग नव्हता म्हणून हे रंगविहारींच फॅड शोधून काढलं त्यानं. तुमाला खरंच वाटतं की त्याला रंगविहारीं संबंधी प्रेम आसंल? अवो साहित्यातला झिरोसुद्धा कळत नाही त्याला. नुस्त आपलं त्यांच्या चार कवितांच पाठांतर करून सगळीकडे बोंबलत फिरतोय... आता हे आमी तुमाला काय सांगायचं म्हना ! तुमचे आजोबा आनंदराव बर्वे आनि रंगविहारी ह्यांची दोस्ती सर्वांस्नी म्हायत हाय. दे वेअर क्लोज फ्रेन्डस्. तुमच्या घराण्यात साहित्याची परंपरा हाय.... मला त्यातलं काय विशेष कळत न्हाय पन ह्या ढाकन्यानं जे काही चालवलयं ते मला यौग्य वाटत न्हाई... नॉट ॲट ऑल !

बर्वे : पैसा आणि प्रसिद्धी कशी मिळवायची हे ज्याला समजतं तो याशस्वी- राजकारणी !

कोल्हे : काय बोलताय माधवअण्णा ? राजकारण कशाशी खातात हे तरी म्हायती हाय का त्याला? आज शीएमनी जवळ केलाय म्हनून शेपटी वर करून गावभर फिरतोय. उद्या लाथ मारली तर कुत्रं हुंगून इचारायचं न्हाय त्याला!

बर्वे : मला तर ह्या मागे काहीतरी वेगळंच कारस्थान असावं असा संशय येतोय.

कोल्हे : काय?

बर्वे : रंगविहारी शताब्दी निमित्तानं समाजातील बुद्धीवादी लोकांमध्ये आपली प्रतिमा उजळ करून घ्यायची आणि येत्या निवडणूकीत त्याचा लाभ उठवायचा...

कोल्हे : ह्यात सौंशय घेन्याचं कारन काय? ओपन शिक्रेट हाय ते ! परवा आबसायेबांशी बोल्लो मी दिल्लीला... त्यांचं पन हेच मत पडलं. मला सांगितलंय त्यांनी की लक्ष ठेवून ह, गरज पडली तर माजी मदत घ्या म्हणाले! (धोरणीपणाने) मला आसं वाटत माधवअन्ना, की आपल्याला आबासायेबांची मदत घ्यावी लागंल...

बर्वे : एवढ्या मोठ्या केंद्रीय मंत्र्याला असा जिल्हा पातळीवरच्या राजकारणात ओढायचा म्हणजे बरं दिसत नाही. म्हणजे त्यांच्या वेळेच्या दृष्टीनं म्हणतोय मी.

कोल्हे : हितं कोनाचा येळ सत्कारनी लागतोय? आनि एक लक्षात घ्या.

बर्वे : काय?

कोल्हे : नियोजनाचा केंद्रबिंदू आता दिल्ली न्हाई तर गल्ली झालेला हाये.

बर्वे : म्हणजे काय करायचं ठरवलय तुम्ही ?

कोल्हे : त्यासाठीच बोलवलय तुमाला हितं. केळकरलासुद्धा बोलवलय. मानूस पाटवला व्हता मेशेज् घेऊन. येईलच तो एवढ्यात आता. (त्याना दरवाज्यातून केळकर येताना दिसतो.) बघा, थिंक ऑफ अ डेव्हील ॲन्ड ही इज देअर... (हसतात.)

केळकर : का बुवा, आज आम्हाला अगदी सैतानपदावर बसवलंत!

कोल्हे : तुमचाच इषय चालला व्हता. (वर्तमानपत्र पुढं करीत) हे घ्या आनि वाचा.

केळकर : काय वाचायचं त्यात कोल्हेसायेब ! सगळा तमाशा सुरू आहे. मुंबई- पुण्याच्या वर्तमानपत्रांनी तर अगदी कहर केलाय. रंगविहारींच्या नावावर काय वाट्टेल ते छापतात! 'ताजी बातमी ' च्या संपादकांनी काय जावईशोध लावलाय माहीत आहे का?

बर्वे : काय-काय?

केळकर : म्हणे य. वा. किर्लोस्करांना रंगविहारी ही पदवी साहित्य सम्राट नारायण शास्त्री पुणतांबेकर यांनी दिली !

कोल्हे : मं कुनी दिली?

केळकर : आता त्यांचा नातूच बसलाय इथं त्याना विचारा !

बर्वे : य. वा. किर्लोस्करांना रंगविहारी ही पदवी माझे आजोबा, 'काव्य सरित- सागर' चे कर्ते आनंदराव बर्वे यांनी दि. ६ जून १९०६ रोजी दिली. त्यादिवशी आपल्याकडं पहिलं अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन भरलेलं होतं. गंमत म्हणजे त्याच दिवशी माझ्या सहा नंबरच्या चुलत आजोबांचं लग्न होतं. त्या लग्नाची पत्रिका मी अजून जपून ठेवलीय. तिच्यावर मागच्या बाजूला चक्क असं छापलेलं आहे की 'सर्व साहित्यिकांची दुपारच्या भोजनाची व्यवस्था लग्नाच्या मंडपात केलेली आहे' तिथं जेवणापूर्वी किर्लोस्करांनी 'रंगबहार' ही त्यांची सुप्रसिद्ध कविता म्हणून दाखविली. ते ऐकून माझे आजोबा उत्स्फूर्तपणे म्हणाले की 'चला रंगविहारी आता जेवायला बसा' तेव्हापासून किर्लोस्कर रंगविहारी झाले ते कायमचे!

कोल्हे : आणि मग साहित्य सम्राट पुणतांबेकरांचं नाव पुढं कसं आलं?

केळकर : ते फक्त साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष म्हणून आले होते. तेवढंच लक्षात घेऊन ढाकणेंनी जाहीर करून टाकलं की रंगविहारी ही पदवी त्यांनीच किर्लोस्करांना दिली...

कोल्हे : पन हे पेपरवाले कशा काय खोट्या बातम्या छापतात?

केळकर : त्यात काय आश्चर्य ? तुम्हाला काय हवय ते मला सांगा मी छापून आणतो जसंच्या तसं... 'ताजी बातमी' च्या संपादकालासुद्धा मी चांगला ओळखतो. त्याला एक बाटली आणि पाच हजार रूपये देऊन एखाद्या दगडाला देव करायला सांगीतलं तर दुसऱ्या दिवसापासून संपूर्ण महाराष्ट्र त्या दगडाच्या पूजेला लागतो.

कोल्हे : लोकांच्या अज्ञानाचा असा फायदा उठवनं म्हंजे मढ्याच्या टाळूवरचं लोनी खान्याचाच प्रकार झाला की, व्हेरी बॅड!

केळकर : ढाकणे तरी दुसरं काय करतोय? गावातनं दोन लाखावर निधी गोळा केलाय. सी.एम.च्या फंडातून किती मिळाले तो आकडा अद्याप फुटलेला नाही. दादासाहेब शिंगणे- पाटील प्रतिष्ठानने एक लाख रूपये रोख दिलेत. 'साहित्य संस्कृती संवर्धन मंडळाने ' ही तितकेच दिल्याचं ऐकतो. नुसती उधळपट्टी चाललेय. रेस्ट हाऊसवर रोज पार्या सुरू झाल्यात. एका पैशाचा हिशेब ठेवलेला नाही....

कोल्हे : व्हाटीज धीस माधवअन्ना? रंगविहारींच्या साहित्यावर माष्टरी आसनारा मानूस, एका पाप्युलर साप्ताहिकाचा संपादक हितं जिवंत आसताना तो ढाकन्या समद्यांच्या डोळ्यात धूळ फेकतोय ना? काय करायचं ते तुम्ही सांगा. आम्ही तुमच्याबरोबर आहोत, काय केळकर?

केळकर : अगदी बरोबर. मला वाटतं ह्याविषयी तुम्ही दिल्लीला जरा आबासाहेबांशी बोलून घ्या.

कोल्हे : परवा त्यानी सोता फोन केला व्हता मला. हा समदा 'पोलिटिकल हश्यू' झालाय आसं त्यांचं बी मत झालंय.

केळकर : आम्हाला तुमच्या त्या राजकारणाशी काहीही घेणे-देणं नाही पण एखादा उपटसुंभ माणूस रंगविहारींच्या नावावर स्वत:ची तुमडी भरून घेत असेल आणि तुम्ही निमूटपणे हा तमाशा बघत असाल तर तुम्हाला लोकप्रतिनिधी म्हणूवून घेण्याचा काहीही अधीकार नाही. काय हो माधवअण्णा?

बर्वे : अगदी बरोबर!

केळकर : (कोल्ह्याना) तुम्हाला साधी गोष्ट सांगतो, रंगविहारींची जन्मतारीख किती?

कोल्हे : आता त्यात काय नवीन? २७ जुलै!

केळकर : साफ चूक. मी नेरीच्या ग्रामपंचायतीत जाऊन सर्व रेकॉर्ड बघून आलो. त्यांच्या जन्म ज्या घरात झाला असं तो ढाकणे सांगत फिरतोय ते घरसुद्धा रंगविहारींच जन्मघर नाही. १८८० साली एका ख्रिश्चन मिशनऱ्यानं कुष्ठरोग्याना दवाखाना म्हणून ते घर बांधलं होतं. तो मिशनरी तिथनं निघून गेल्यावर वर्षोन् वर्षे ते घर तसंच पडून राहिलं. कुष्ठरोग्यांचा दवाखाना म्हणून त्या घराकडे कोणीही फिरकत नसे.

कोल्हे : मग?

केळकर : ह्या एकांताचा गावातील काही रंगेल मंडळींनी वेगळ्याच कारणासाठी फायदा उठवायला सुरूवात केली.

कोल्हे : काय म्हणता?

केळकर : मी हे खात्रीशीर माणसाकडून ऐकलंय... ह्या असल्या घरात ढाकण्यानी रंगविहारींना जन्माला घातलं ह्यावरून त्याची अभिरूची कोणत्या पातळीवरची आहे हे तुमच्या लक्षात येईल. ढाकणे लोकांना सांगतात की, रंगविहारींनी आपल्या बहुतेक सर्व कविता गावाबाहेरच्या आमराईत बसून लिहिल्या...

कोल्हे : मग?

केळकर : : मी कलेक्टर ऑफिसमध्ये जाऊन गॅझेट चाळलं तर १८९८ पासून आजतागायत नेरी गांवच्या परिसरात एकही आंब्याचं झाड असल्याचा उल्लेख नाही.

कोल्हे : च्या मायला!

केळकर : परवा मुंबईच्या पत्रकारांनी ढाकण्याना आग्रह केला की आम्हाला ती आमराई दाखवा. तर ढाकणे काय म्हणाले असतील ?

कोल्हे : काय म्हनाला?

केळकर : म्हणाले, लोकांनी आंब्यांची झाडं तोडून नेली.

कोल्हे : (फुटल्यासारखे हसतात.)

केळकर : त्यांच्या म्हणण्याप्रमाणे रंगविहारींचा जन्म २७ जुलै रोजी नेरी या गांवी झाला ना?

कोल्हे : (भाबडेपणाने) हां...

केळकर : पण त्या वर्षी नेरी हे गावच अस्तित्वात नव्हतं.

कोल्हे : काय म्हणता काय?

केळकर : अगदी स्पष्टपणे सांगायचं तर नगराध्यक्ष असूनही आवश्यक तो इतिहास तुम्हाला माहीत नाही. १८८४ साली बाणगंगा नदीला महापूर आला होता. त्या पुरात नदीच्या काठावरचं नेरी हे गाव पूर्णपणे उध्वस्त झालं. त्या वेळच्या कलेक्टरांनी त्या गावाचं पुनर्वसन जिल्ह्याच्या गावाशेजारी केलं. तेच हे गांव नेरी. म्हणजेच नेरी हे गाव जेव्हा इथं जन्माला आलं तेव्हा रंगविहारींचं वय होतं १४ वर्षांचं! आता बोला...

कोल्हे : मं रंगविहारींचा जन्म झाला तरी कुठं?

केळकर : तेच सांगतोय मी तुम्हाला. त्यांचा जन्म झाला वावडद्याला. तिथं प्लेगची साथ होती म्हणून वासुदेवराव किर्लोस्करांनी त्याना उनेरीला हलवलं. तिथनं ते शाळा शिकण्यासाठी पुढं ह्या नेरीला आले. उनेरी माहिताय ना?

कोल्हे : आफकोर्स ! गरम पान्याचे झरे हायेत तेच ना?

केळकर : अगदी बरोबर. तेथील गरम पाण्याच्या झऱ्यांचे अनेक उल्लेख रंगविहारींच्या कवितांत आढळतात.... तिथल्या शाळेतला दाखला बघून ढाकण्यानी लगेच नेरी हे रंगविहारींच जन्मगांव म्हणून घोषित करून टाकलं.

कोल्हे : च्यामारी!

केळकर : त्यांची जन्मतारीख २७ आहे असं हे लोक म्हणतात पण त्यातला सातचा आकडा हा मूळात शून्याचा आहे. त्याच्यावरची अर्धी बाजू खरवडली गेल्यामुळं तो सातचा झाला. रंगविहारींचे बालमित्र ए.का.कशाळकर ह्यांच्या वडिलांनी रंगविहारींची जन्मपत्रिका बनवलेली आहे. त्यांच्या बहिणीची नात मालविका आपटे इंदूरला हिंदीची प्राध्यापिका आहे. तिच्या घरी जाऊन मी स्वतः ती पत्रिका बघून आलोय !

कोल्हे : माजं टकुरं फिरायची येळ आलीय.

केळकर : कोल्हेसाहेब, लोकांना हे माहीत नाही अशातला भाग नाही. पण कोणी जाहीरपणे बोलत नाही इतकंच आणि हल्ली लोकांना अशी रिकामी कामं करायला वेळ आहेच कुठं? जो तो आपापल्या व्यापात अडकलेला.काय?

कोल्हे : पन हा ढाकन्या रंगविहारींसंबंदी खोटा इतिहास निर्मान करत आसंल तर आपन वस्तुस्थिती लोकांसमोर आनायला नको कां? मला तर आसं वाटतं की आपन त्याला धडा शिकवलाच पायजे. वुई विल टीच हिम अ लेसन. म्हने स्मारक म्हनून घरकुल बांदायचं! तुमी दोघानी मला माफ करा कारन मी जातीयवादी हाये आसं तुमाला वाटल....

केळकर : नाही नाही, आगदी मोकळे पणानं बोला तुम्ही !

कोल्हे : हा ढाकन्या मुळांत एका गवंड्याचा पोरगा. आपन म्हन्तो की गवयांचं कार्ट सुरातच रडायचं. तसा हा जातीचा गवंडी आसल्यामुळं आता घरकुल बांदायला निघालाय. आवो, कोंबड्याच्या सपनात येऊन येऊन काय येनार फकस्त दानेच ना? (सर्वजण हसतात) आपन ढाकन्याला धडा शिकवायचा हे नक्की! माधवअन्ना तुमी जरा दिल्लीला आबासायेबाना ट्रंककॉल लावा. लायटनिंग करा. आणि केळकर तुमी मला जरा एका पत्रकाचा ड्राफ तयार करून दाखवा, आजच्या आज छापून घ्या. उद्या आपन प्रेस कान्फरन्स बोलवू आनि बामगोळा टाकू.

बर्वे : म्हणजे?

कोल्हे : आपन आपल्यापरिनं इस तारखेला हितंच रंगविहारींचा समांतर जन्मशताब्दी सोहळा साजरा करायचा– फायनल ! ( झपकन अंधार होतो. अंधारातून चिमण्यांचा कलकलाट ऐकू येतो. शांताबाई पडवीच्या खांबाला टेकून बसल्यात. राजन आतून येतो. त्याच्या हातात औषध आणि पाण्याचे भांडं.)

राजन : (औषध देत) ही घे गोळी. (पाणी देतो.) शांताबाई गोळी घेतात.) आराम पडलाय ना आता?

शांताबाई : कालपासून बरं वाटतय जरा. तू आहेस म्हणून जास्त बरं वाटतयं.

राजन : खरं म्हणजे एव्हाना जायला हवं होतं मला. रजा शिल्लक नाही. शिवाय शोध निबंधाची जुळवाजुळव करायची होती.

शांताबाई : आता आलाहेस एवढ्या लांबून तर चार दिवस थांब...

राजन : थांबून काय करू ? मला जे पाहिजे त्या विषयी तू काहीच बोलत नाहीस...

शांताबाई : काय बोलू?

राजन : काकांच्या कवितेविषयी आणि आयुष्याविषयी अधिकृतपणे माहिती देणारा तूच एकमेव दुवा आहेस... तू जर कायम तोंड बंद ठेवलय तर त्यांच्यासंबंधी निर्माण झालेले अनेक प्रश्न तसेच कायम राहतील... त्यांना समजून घेण्यासाठी सर्वात महत्त्वाचा मार्ग बंद होईल.

शांताबाई : त्याला समजून घेण्यासाठी त्याची कविता आहे की !

राजन : हो पण त्यांच्या साहित्यविषयक जाणिवा आणि त्यांचे व्यक्तिगत आयुष्य यांतील सुसंगती शोधणं नवीन समीक्षेला अभिप्रेत आहे. परवा तूच म्हणाला होतास ना की त्यांच्या साहित्याशी त्यांच्या व्यक्तिगत आयुष्यात काहीही संबंध पोहोचत नाही म्हणून ! ते मी वेगळ्या दृष्टीकोनातून बोललो होतो.

शांताबाई: (स्मीत करीत) तुला काय हवंय ते तुला माहीत नाही राजन.

राजन :  पण तू नीट उत्तर तर देशील...

शांताबाई : नीट प्रश्न विचारल्याशिवाय?

राजन : रंगविहारींचा मृत्यू झाला त्यादिवशी त्यांची मन:स्थिती कशी होती, दिवसभर ते काय करीत होतो, घरातलं वातावरण कसं होतं?

शांताबाई : हे सर्व लिहिलंयस की तू त्यांच्या चरित्रात.

राजन : पण त्याविषयी कुणीही काही शंका व्यक्त केली नाही.

शांताबाई : यावरून टीकाकारांचा बौद्धिक दर्जा कोणता आहे हे तू ओळखायला हवं होतंस!

राजन : म्हणजेच तू हे मान्य करतेस की मी जे काही लिहिलं त्यापेक्षा वेगळंच काहीतरी घडलं होतं.

शांताबाई : तुला स्वतः विषयीची खात्री नाही!

राजन : म्हणजे?

शांताबाई : आपण खोटं चरित्र लिहिलय असं मान्य करतोयस तू!

राजन : तुझ्या भल्यासाठीच लिहिलय मी तसं.

शांताबाई : अस्सं? किती शहाणा आहे माझा बाळ.

राजन : मला बाळ समजतेस तू?

शांताबाई : माझं हे मत असून जगाला माहीत नाही. त्यांच्या दृष्टीने तू विद्वान प्राध्यापक वगैरे आहेस. आणि ती प्रतिमा टिकविण्यासाठी तुला काही खास परिश्रमसुद्धा करावे लागणार नाहीत. कारण कवीविषयी तू काहीही लिहिलंस तरी त्याला आव्हान द्यायला कोणीही पुढं येणार नाही अशी खात्री झालेय माझी.

राजन : १३ डिसेंबर १९२० रोजी रंगविहारींचं निधन झालं ही तरी खरी गोष्ट आहे ना ?

शांताबाई : हे सगळ्या जगाला माहीत आहे. त्यात नवीन काय सांगितलंस ?

राजन : जे नवीन सांगितलं गेलं नाही ते शोधायचंय.

शांताबाई : म्हणजे नव्या वादाला तोंड फोडायचय तुला... वर्षभर मजेत स्तंभलेखन करू शकशील त्यावर. भरपूर पैसे मिळतील. नंतर पुस्तकसुद्धा निघेल. कवीचे चाहते हातोहात विकत घेतील ते!

राजन : मला काकांच्या आयुष्याचा बाजार मांडायचा नाही.

शांताबाई : (स्मीत करीत) वदतो व्याघात...

राजन : काकूऽऽऽ

शांताबाई : अरे संतापतोहेस कशाला एवढा?

राजन : तुला वाटतं तसा मी काकांच्या आयुष्याचा बाजार मांडलेला नाही.

शांताबाई : हे ऐकून त्यांच्या आत्म्याला शांती मिळेल.

राजन : विषय टाळू नकोस तू. मी विचारतो त्या प्रश्नांची उत्तर दे.

शांताबाई : ही आज्ञा म्हणायची की–

राजन : विनती!

शांताबाई : ठीक, बोल...

राजन : रंगविहारी विषमज्वराने मेले असं म्हणतात.

शांताबाई : जन्म-मृत्यू नोंदवहीत तशी नोंद आहे.

राजन : मोठ्या काकांनी ती मुद्दाम तशी करून घेतली आहे.

शांताबाई : कशावरून?

राजन : आनंदराव बर्व्यांची 'भंगलेला अरुण' ही कविता माहीताय तुला?

शांताबाई : तोंडपाठ आहे.

राजन : त्या कवितेखाली त्यांनी १३ डिसेंबर १९२० ही तारीख टाकलीय. म्हणजे ज्या दिवशी रंगविहारींचं निधन झालं त्या दिवशी ती त्यांनी लिहिली.

शांताबाई : पुढं बोल.

राजन : रंगविहारी आजारी होते तेव्हा त्यांना भेटायला बर्वे नेहमी इथं यायचे हे खरं आहे?

शांताबाई : कधी कधी बर्वे यायचे हे खरं आहे परंतु इतर वेळी अनेकदा कवीच रात्रीच्या वेळी बर्व्यांकडे जाऊन बसायचा.

राजन : दोघांची अतूट मैत्री असल्यामुळे रंगविहारींच्या मृत्यूमुळं बर्व्यांना धक्का बसला...

शांताबाई : (उपरोधाने) आणि त्यांनी भंगलेला अरुण' ही कविता लिहिली.

राजन : खात्री आहे तुला तशी?

शांताबाई : ही संधी सोडली तर तो कवी कसला?

राजन : ही कविता तोंडपाठ करावी असं का वाटलं तुला?

शांताबाई : मी ती केली नाही. नाईलाजाने झाली.

राजन : म्हणजे?

शांताबाई : एक तर माझी स्मरणशक्ती चांगली होती आणि दुसरं म्हणजे बर्व्यांनी शेवटच्या कडव्यात केलेली एक चूक अनन्यसाधारण होती.

राजन : कोणती चूक?

शांताबाई : यमक जुळवण्यासाठी त्यांनी अरुणचा 'आरुण' केला होता.

राजन : ते कडवं म्हणून दाखवतेस?

शांताबाई : लाटांची थरथर असली

नि:शब्द मुकी दारूण

कवटाळून हृदयापाशी

भंगला येथ आरूण...

राजन : अर्थ सांगशील ह्या ओळींचा?

शांताबाई : मावळणाऱ्या सूर्याचं प्रतिबिंब पाण्याच्या तळाशी पडलंय. त्यामुळं त्यानं सूर्य आपल्या छातीशी कवटाळलाय असा भास होतो. पाण्याच्या सतत येणाऱ्या लाटांमुळं ते प्रतिबिंब खंडित होताना दिसतं आणि त्यामुळं कवीनं त्यासाठी 'भंगणे' हा शब्दप्रयोग केलाय.

राजन : फार हुषार आहेस तू काकू...

शांताबाई : तुला शंका का येतेय?

राजन : चुकीचा अर्थ खरा वाटावा इतक्या चतुरपणे सांगीतेयस तू.

शांताबाई : तुला काय म्हणायचंय?

राजन : ११ डिसेंबरच्या रात्री रंगविहारींनी 'आल्हाददायक झुळूक' म्हणून एक कविता लिहिलेली आहे. वाळवंटातून प्रवास करणाऱ्या एका माणसाला अचानक पुष्करणी दिसते तिथे जाऊन विसावा घेतल्यानंतर त्याक्षणी तिथेच आपला प्रवास संपावा अशी इच्छा तो कवितेतून प्रदर्शित करतो.

शांताबाई : बरं मग?

राजन : ही कविता त्यांनी आपल्या घरी बसून लिहिली असं बर्व्यांनी त्यांच्या आत्मचरित्रात म्हणलंय.

शांताबाई : बरोबर आहे.

राजन : बर्व्यांचं घर येथून किती लांब आहे?

शांताबाई : असेल मैलभर...

राजन : मग विषमज्वराने अंथरूणाला खिळलेला माणूस मृत्यूच्या दोन दिवस आधी आपल्या पायांनी दीड दोन मैल चालत जाऊन परत येऊ शकेल?

शांताबाई : नक्की काय म्हणायच तुला?

राजन : ऐकण्याची हिम्मत आहे?

शांताबाई : हिम्मत आहे म्हणून तर इतकी वर्षे जगले. सांग तू.

राजन : रंगविहारींना कवितेची जबरदस्त नशा असायची. त्या कैफात ते जगाचं भान विसरून जायचे. अशावेळचं त्यांच वागणं लोकांना चमत्कारिक वाटायचं. प्रतिमेचं बोट धरून ते जेव्हा काव्याच्या अलौकिक विश्वासमध्ये मुक्तपणे संचार करीत असत तेव्हा इतर माणसं व्यवहाराच्या घाणेरड्या गटार गंगेत कीटकांसारखी वळवळत असत. तुही त्या इतरांपैकीच एक होतीस रंगविहारींचं वागणं तुला अपमानास्पद वाटायचं. जिथं जिथं संधी मिळेल तिथं तू त्यांचा तेजोभंग करण्याचा प्रयत्न करायचीस. महाराष्ट्राच्या त्या लाडक्या पाखराचं संपूर्ण भावविश्व तू उध्वस्त करून टाकलं होतंस. तुझ्या क्षूद्र विचारांच्या काटेरी तारांच कुंपण तू त्यांच्या नवनवोन्वेषशाली प्रतिभेला घालू पहात होतीस. त्यातूनच त्यांचं मानसिक स्वास्थ्य हळूहळू बिघडत चाललं. तुमचं लग्न झाल्यानंतर त्यांनी लिहिलेल्या अनेक कवितातून हे सप्रमाण सिद्ध करता येईल... ते घरी आले की तू रोज त्यांच्याशी भांडण उकरुन काढायचीस. त्या दिवशीही त असंच भांडण उकरून काढलंस तू! भरल्या ताटावरून ते उठले आणि बर्व्यांकडे गेले पण तिथंही त्यांच्या घायाळ मनाला दिलासा मिळाला नाही, जणूकाही तू ओरबाडून काढलेल्या त्यांच्या आयुष्यामधून संपूर्ण जीवनरस वाहून गेला होता. तशाच विमनस्क स्थितीमध्ये मध्यरात्रीनंतर ते घरी आले. तुझी झोपमोड झाल्यामुळं तू अश्लाघ्य शद्बांत त्यांचा पाणउतारा केलास. तो घाव वर्मी बसला... त्याच तिरमीरीत ते धावत आडापाशी गेले आणि त्यांनी आत उडी मारली... त्यांचं फुगून वर आलेलं प्रेत पाहून बर्व्यांनी लिहिलं –

लाटांची थरथर असली

निःशब्द मुकी दारूण

कवटाळून ऱ्हदयापाशी

भंगला येथ आरूण...

तू मारलंस त्यांना काकू. तू मारलंस. एका प्रतिभाशाली प्रज्ञावंताचा अकारण जीव घेतलास. मराठी साहित्याचं प्रचंड नुकसान केलंस. आपल्या घरण्याची अब्रू वेशीवर टांगली जाऊ नये म्हणून कुठं बोललो नव्हतो मी हे. आणि दुसरं म्हणजे तुझी काळजी होती. लोकांना हे समजलं असतं तर त्यांनी तुला दगडांनी ठेचून मारली असती

शांताबाई : तू इतका मूर्ख आहेस की तुझ्या अंगी पोलिसांत भरती होण्याची योग्यता निश्चित आहे.

राजन : आता काय खोटारडेपणा करणार आणखी?

शांताबाई : नाईलाजानं खरं बोलावं लागणार आहे आता.

राजन : ती सुबुद्धी झाल्याबद्दल परमेश्वराचे आभारच मानले पाहिजेत, बोल!

शांताबाई : कवी विषमज्वरानं मेला हे खोटं आहे.

राजन : पाण्यात बुडाल्यामुळे त्यांना मृत्यू आला हे आत्ताच सिद्ध केलंय मी.

शांताबाई : गैरसमज आहे तुझा. त्याला विषमज्वर झाला नव्हता तर दुसराच आजार झाला होता.

राजन : कोणता?

शांताबाई : गंभीर स्वरूपाचा लैंगिक आजार होता तो - गुप्तरोग !

राजन : एक महान कवी आणि स्वत:च्या नवऱ्याविषयी हे बोलवतं तरी कसं तुला?

शांताबाई : ते बोलण्याची वेळ यावी हे माझं दुर्दैव.

राजन : तुझ्या बोलण्याला काय पुरावा आहे?

शांताबाई : फार पूर्वी कुणीतरी गावाबाहेर कुष्ठरोग्यांसाठी एक दवाखाना बांधून ठेवला होता. तो बंद झाल्यावर अनेक वर्षे तसाच पडून होता... त्या पडिक दवाखान्यांत कवीनं राजम्मा नावाची एक बाई आणून ठेवली होती.

राजन : खोटं!

शांताबाई : ती बाई खानदानी व्यावसायिक होती. तिनं कवीला लुबाडायला सुरुवात तर केलीच पण इतरांनाही नादाला लावलं. दिसायला फार सुंदर होती ती.

राजन : शंभर टक्के खोटं!

शांताबाई : कशावरून?

राजन : तू तिला बघायला गेली होतीस?

शांताबाई : नाही.

राजन : मग ती सुंदर होती हे तुला कसं माहीत?

शांताबाई : कारण मला बघायला तीच इथं आली होती.

राजन : मला वेड लागायची पाळी आलीय.

शांताबाई : म्हणजे अजून तू शहाणा होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

राजन : स्वत:ला फार शहाणी समजू नकोस...

शांताबाई : मी कुठं म्हटलय तसं ?

राजन : (अधिकच चिडत) ठार वेडी आहेस तू !

शांताबाई : मी वेडी आहे म्हणूनच जगत राहिले. आंधळी, मुकी आणि बहिरी म्हणून लोकांनी आधीच मोडीत काढलं होतं. हे वेड जर पांघरलं नसतं तर जगणं अशक्य झालं असतं... मी जे काही ऐकलयं, बघितलंय आणि सोसलयं त्याच्या मनावर गाठी पडल्यात. काळाच्या ओघात घट्ट होत गेल्यात त्या उकलण्याचा प्रयत्न केलास तर कवीचं चरित्र बदलून लिहावं लागेल तुला...

राजन : काकांनी खरेच राजम्मा नावाची बाई ठेवली होती?

शांताबाई : तिच्यापासून त्याला गुप्तरोग झाला होता इतपत माहिती दिलेय मी तुला.

राजन : तुझ्या या बोलण्याला काय पुरावा आहे?

शांताबाई : रोज रात्र झाली की कवी राजम्माकडं जायचा. तिथंच त्याचं खाणं- पिणं सर्वकाही व्हायचं...

राजन : पण ते तिथं का जायचे? तिथं जे सुख त्यांना मिळायचं ते तू त्यांना इथं देत नव्हतीस का?

शांताबाई : हाच प्रश्न मला एका पत्रकारानं विचारला होता....

राजन : मग काय उत्तर दिलं होतंस.

शांताबाई : वहाणेनं थोबाडं फोडलं त्याचं.

राजन : का? उत्तर द्यायला काय हरकत होती?

शांताबाई : उत्तर द्यायला माझी हरकत नव्हती. पण त्यानं ज्या भाषेत तो प्रश्न विचारला त्यामुळं मी चिडले.

राजन : मी योग्य भाषेत विचारलायना?

शांताबाई : इतका विद्वान प्राध्यापक तू बोलायचं कसं हे सांगायला हवं तुला?

राजन : मग दे उत्तर .

शांताबाई : अरे शरीर म्हणजे काय ते कळतसुध्दा नव्हतं त्या वयात मला. त्यात तो दारू पिऊन यायचा. भसाभसा विड्या ओढायचा. मला बघितल्यावर त्यांच्यातलं जनावर जागं व्हायचं... माझ्या भावनांचा चोळामोळा करून तो जेव्हा माझ्या शरीराशी खेळ करायचा तेव्हा मला किळस यायची त्याची... माझ्याकडं जे नव्हतं त्यांची मागणी करायचा... तशात त्याचा बाहेरख्यालीपणा वाढत गेला. त्यात भर म्हणून की काय त्याला तो घाणेरडा रोग जडला. नीट चालताही यायचं नाही त्याला. मी अनेकदा सांगायची पण तो काहीही ऐकायचा नाही. १३ डिसेंबरला त्याचा मृत्यू झाला. तो दिवस जसाच्या तसा आठवतोय मला... त्या दिवशी गावात सैन्यभरतीसाठी मिलिट्रीचे लोक आले होते. त्यातले काहीजण रात्री राजम्माकडं गेले. तिथं राजम्मावरून कवीची आणि त्यांची बाचाबाची झाली. त्यांनी राजम्मासमोर कवीला मारहाण केली आणि बाहेर फेकून दिला. आधीच त्याचं दुखणं विकोपाला गेलं होतं त्यात त्याला हा मार आणि अपमान सहन झाला नाही. पहाटे

तीन-साडेतीनच्या सुमारास आडात धपकन काहीतरी पडल्याचा आवाज ऐकू आला पण त्याचं गांभीर्य लक्षात न आल्यामुळं मी तिकडे दुर्लक्ष केलं. सकाळी उठून पाहाते तर आडात त्याचं प्रेत ... लगबगीनं मी मोठ्या भाऊजींना बोलावलं. त्यांनी कर्मावर हात मारून घेतला म्हणाले 'ह्याची वाच्यता कुठं करू नकोस' तेव्हापासून तोंडाला कुलूप घातलं ते आजपर्यंत...

राजन : राजम्माच्या घरी काय घडलं हे तुला कसं कळलं ?

शांताबाई : कवी गेल्यानंतर पंधरा दिवसांनी एका संध्याकाळी अचानक दारात एक बाई येऊन उभी राहिली. देखणी बाई मी क्षणार्धात ओळखलं की ही राजम्माच असणार. मला नमस्कार करून ती म्हणाली, “बाई आजपासून हे गांव सोडून चालले मी, कवीचा हा एवढा कागद घरी राहिला होता तो द्यायला आलेय” असं म्हणून कागदाचा एक तुकडा माझ्यासमोर टाकून ती निघून गेली.

राजन : काय होतं त्या कागदावर ?

शांताबाई : दुसरं काय असणार? कविता मराठीत गाजलेली. साहित्याचं अमौलिक लेणं इत्यादी...

राजन : कोणती कविता?

शांताबाई : आल्हाददायक झुळूक.

राजन : काय म्हणतेस?

शांताबाई : आता आलं असेल तुझ्या लक्षात की त्या कवितेतीलं 'वाळवंटातला यात्रिक' कोण आणि 'पुष्करणी' कोणती ते. पण बर्व्यांनी आपल्या आत्मचरित्रांत तर लिहिलंय की ती कविता रंगविहारींनी त्यांच्या घरी बसून लिहिली. कवितेखाली ११ डिसेंबर ही तारीख होती. मग त्यांनी मृत्यूपूर्वी दोन दिवस आधी लिहिलेली कविता राजम्मांकडे जाईलच कशी ?

शांताबाई : उत्तर अगदी सोपं आहे.

राजन : काय?

शांताबाई : चरित्राप्रमाणंच आत्मचरित्रंही खोटं लिहिता येतं.

राजन : बर्व्यांचं आत्मचरित्रसुध्दा खोटं आहे असं म्हणायचंय का तुला? तूच खोटं बोलत नाहीस कशावरून?

शांताबाई : कवीनं त्या कवितेखाली १३ डिसेंबर - मध्यरात्र' असं लिहून स्वाक्षरी केली होती. राजम्मानं दिलेला तो कागद अजून जपून ठेवलाय मी. कवी वारल्यावर मी त्या कवितेची नक्कल करून खालची तारीख बदलून ती 'काव्यसरित्सागर ' कडे पाठविली. त्यात ती जशीच्या तशी प्रसिद्ध झाली.

राजन : म्हणजे रंगविहारी त्या रात्री बर्व्यांच्या घरी गेलेच नव्हते?

शांताबाई : त्या रात्री काय कोणत्याच रात्री तो तिकडे जात नव्हता.

राजन : मग कुठं जात होते?

शांताबाई : मघाशीच सांगितलं ना बर्व्यांच्या निमित्तानं तो रोज राजम्माकडे जात होता.

राजन : पण बर्व्यांनी त्यांना असं संरक्षण देण्याचं कारण काय ?

शांताबाई : दोघांनी मिळून शोधलेली पळवाट होती ती.

राजन : लक्षात नाही आलं माझ्या...

शांताबाई : सोपं आहे अगदी... बर्वेसुद्धा राजम्माकडे जात होते!

( अंधार होऊ लागतो. विजांचा लखलखाट. सोसाट्याचा वारा सुटतो. पडदा.)

**मध्यंतर.**

***

सूचना : हे नाटक पूर्णपणे काल्पनिक असून त्यातील एखादी व्यक्ती व प्रसंग ह्यांचे प्रत्यक्ष जीवनात कोठे साधर्म्य आढळून आल्यास तो केवळ योगायोग समजावा.

या नाटकाची पूर्ण संहिता हवी असेल त्यांनी वेबसाईटवर दिलेल्या पत्त्यावर लेखकाशी संपर्क साधावा. सर्व हक्क लेखकाकडे राखीव. प्रयोग करण्यापूर्वी लेखकाची लेखी परवानगी घेणे बंधनकारक आहे. नाटकाचे भाषांतर, रूपांतर, त्यावर आधारित चित्रपट, चित्रमालिका, अभिवाचन, यूट्युब-फेसबुकवरील किंवा अशा अन्य माध्यमातून पूर्ण, अंशतः किंवा तत्सम कोणत्याही प्रकारच्या चित्रिकरण, ध्वनिमुद्रण, प्रसारण, अविष्कारापूर्वी लेखकाची परवानगी घेणे बंधनकारक आहे.

***